पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**

P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३०४७ दि. २१/०९/२०१९**

<u>वार्ता टिपण दिनांक २१/०९/२०१९</u>

## अंमली पदार्थ विरोधी पथक,पश्चिम, गुन्हे शाखा पुणे कडुन १२ लाखाचे कोकेन व इतर ऐवज नायजेरियन इसमाकडून जप्त व त्यास अटक

पुणे शहराचे मा.पोलीस आयुक्त श्री.डॉ.वेंकटेशम सो., पोलीस सह आयुक्त श्री.रविंद्र शिसवे सो. यांनी अंमली पदार्थ विक्री करणा-यांचे समूळ उच्चाटन करण्या संदर्भात मार्गदर्शनपर सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार दिनांक २०/०९/२०१९ रोजी गुन्हे शाखेकडील पोलीस निरीक्षक राजेंद्र मोहिते व पोलीस उप निरीक्षक निलेश महाडीक यांना मिळालेल्या गोपनीय बातमीचे आधारे, पोलीस निरीक्षक राजेंद्र मोहिते व त्यांचे पथकाने पुणे कोंढवा परिसरातील ब्रम्हा ॲव्हेन्यू सोसायटीचे आऊट गेट समोर असणा-या सार्वजनिक रस्त्यावर त्यांनी दोन पंचांसह सापळा रचुन नायजेरियन देशाचा नागरीक नामे UBA SAVIOUR GODWIN, R/O FLAT NO.303, 3rd FLOOR, SAMARTH APARTMENT, SR.NO.6/1/1/1, PISOLI PUNE. NATIVE PLACE – NIZERIA, IMO STATE, ORLU CITY, LAGOS STREET हा दुचाकी वाहनावरुन येत असताना त्यास पकडून, त्याची झडती घेतली असता, त्याचे पाठीवर असलेल्या काळे रंगाचे सॅगबॅकची पहाणी करता त्यात खालील प्रमाणे कोकेन अंमली पदार्थ व इतर वस्तु मिळुन आल्या आहेत.

(१) २००/- रु. नायझेरियन इसम नामे UBA SAVIOUR GODWIN याचे पाठीवर असलेली काळया रंगाची सॅगबॅग त्यावर इंग्रजीत एचपी असे लेबल असलेले.
(२) १०,००,०००/- रु. नायझेरियन इसम नामे UBA SAVIOUR GODWIN याचे पाठीवर असलेली काळया रंगाची सॅगबॅग मध्ये २०० ग्रॅम वजनाचे कोकेन अंमली पदार्थ.
(३) १,८४,१९०/- रु. रोख रक्कम त्यात भारतीय चलनातील वेगवेगळया दराच्या नोटा.
(४) ००/- रु.वर नमूद सॅगबॅगमध्ये मिळालेला FEDERAL REPUBLIC OF NIGERIA या देशाचा पासपोर्ट.
(५) ००/- रु.वर नमूद सॅगबॅगमध्ये मिळालेल्या एका प्लॅस्टीकचे पिशवीत, पांढ-या रंगाच्या पातळ प्लॅस्टिकच्या छोटया पिशव्या.
(६) ५००/- रु. एक नोकिया कंपनीचा मोबाईल फोन, काळे रंगाचा.
(७) ३०,०००/- रु.एक होंडा डिओ कंपनीची गडद निळया काळया रंगाची दुचाकी गाडी.
(८) ६००/- रु.एक पॉकेट इलेक्ट्रॉनिक डिजीटल वजनकाटा / स्केल जु.वा.किं.अ.

---

<u>१२,१५,४९०/-</u> रु.चा माल मिळाला आहे.तो पंचनाम्याने जप्त केला आहे. त्याबाबत पोलीस उप निरीक्षक निलेश महाडीक यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वर नमुद नायजेरियन इसमाविरुध्द कोंढवा पोस्टे पुणे येथे गु.र.नं. ७७८/२०१९ एनडीपीएस ॲक्ट कलम ८(क), २२(क) प्रमाणे गुन्हा दाखल झाला असून, सदर गुन्हयात वर नमुद नायजेरियन इसमास दि.२१/०९/१९ रोजी अटक केली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक विजय टिकोळे हे वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली करीत आहेत.

सदरची कामगिरी ही गुन्हे शाखेचे अपर पोलीस आयुक्त श्री. अशोक मोराळे सो.पोलीस उपायुक्त श्री. बच्चनसिंग सो. सहा.पोलीस आयुक्त श्री शिवाजी पवार सो. यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राजेंद्र मोहिते, पोलीस उप निरी.निलेश महाडीक, किशोर तनपुरे, पोलीस कर्मचारी अविनाश मराठे, भाऊसो.कोंढरे, प्रसाद मोकाशी, रमेश गरुड, उदय काळभोर, पांडुरंग वांजळे, धिरज भोर, महेश कदम,मनोज शिंदे, विजय गुरव, सचिन कोकरे, संदिप साबळे, प्रविण पडवळ, अमोल पिलाणे, नारायण बनकर यांनी केली आहे.